# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## मंगळवार, दिनांक १० मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

**श्री. सतेज उर्फ बंटी पाटील,** ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनिल शिंदे, एकनाथराव खडसे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, अरुण लाड, राजेश राठोड, जगन्नाथ अभ्यंकर, जयंत आसगावकर, मिलिंद नार्वेकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यातील नगरपालिका, महानगरपालिकेचा कारभार प्रशासनामार्फत गेले अनेक वर्ष चालविल्यामुळे वाढलेला गैरव्यवहार व नागरी सोयींचा उडालेला बोजवारा, विशेषत: मुंबई महानगरपालिकेत ८१ हजार ४४९ कोटी ३२ लाख रूपयांच्या ठेवी मोडून त्यापैकी ३६ हजार ६२३ कोटी रुपये विविध प्रकल्पांसाठी वापरण्यांचे निश्चित केल्याने त्यामध्ये झालेली अनियमितता, मुंबईची सर्वसामान्यांची लाईफलाईन असलेली बेस्ट बंद करण्याचा डाव असणे, विविध मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार, एमएमआरडीए तसेच सिडको या प्राधिकरणांमध्ये वाढलेला गैरव्यवहार, त्यामुळे त्यांची ढासळलेली आर्थिक स्थिती, विविध शहरांचे विकास आराखडे व हद्दवाढीचे प्रस्ताव रखडणे, मिठी नदी स्वच्छता व गाळ काढणे या निविदेत झालेली अनियमितता, तसेच नागपूर महानगरपालिकेत कंपोस्ट डेपो, रिंग रेल्वे, डम्पिंग यार्ड, इत्यादी कामात झालेली अनियमितता, एसटीपी प्रकल्प नसल्याने पाणी निचऱ्याचा प्रश्न ऐरणीवर येणे, मोठया प्रमाणात उड्डाण पूल तयार होऊनही वाहतूक कोंडी निर्माण होणे, तसेच निधी अभावी दुरुस्तीची कामे रखडलेली असणे, गृहनिर्माण धोरणाची अंमलबजावणी न होणे, एसआरए अंतर्गत झालेला भ्रष्टाचार, जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीचे धोरण निश्चित करणे, म्हाडाच्या लॉटरीमध्ये झालेला गैरव्यवहार, गिरणी माथाडी व सफाई कामगार व पोलीस कर्मचारी यांना हक्काची घरे प्राप्त न होणे, केंद्र सरकारच्या जमिनीवरील झोपडपट्टी व इमारतीबाबत धोरण ठरविणे, सार्वजनिक बांधकाम अंतर्गत राज्य महामार्ग व इतर रस्त्यांची तसेच अन्य कामे निधी अभावी रखडली असून ठेकेदारांना पुरेसा व वेळेवर निधी मिळत नसल्याने रस्त्याचा दर्जा निकृष्ट असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**संसदीय कार्य मंत्री** : विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक ०८ डिसेंबर, २०२५ ते दिनांक १४ डिसेंबर, २०२५ या कालावधीत मा.मंत्री/मा. राज्यमंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण १५० आश्वासनांची यादी, तसेच सन २०२५ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १३२ आश्वासनांच्या पूर्तता विवरणपत्रे यादीसह, विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**तीन विनंती अर्ज सादर करणे:-**

**श्री.हेमंत पाटील, वि.प.स.** : "जालना जिल्ह्यातील सन २०२० ते फेब्रुवारी, २०२५ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या अतिवृष्टी अनुदान वाटपात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**चार : विधानपरिषद विशेषाधिकार समितीचा खालील प्रकरणासंदर्भातील अहवाल सादर करणे : -**

सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री. श्रीकांत भारतीय व श्री. प्रविण दरेकर यांनी श्री. सुर्यकांत हौसराव मोरे, मु.पो. रत्नापूर, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्याविरूध्द दिनांक २४ नोव्हेंबर, २०२५ रोजी उपस्थित केलेले विशेषाधिकारभंग व अवमानाचे प्रकरण.

**पाच : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६, शुक्रवार, दिनांक ६ मार्च, २०२६ व सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन (अनुक्रमांक १):-**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर मराठी भाषा मंत्री निवेदन करतील :-**

केंद्र सरकारने मराठी भाषेला दिलेला "अभिजात दर्जा" कागदावर असल्याबाबत.

(२) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १२ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

मुंबईतील रस्ते आणि पदपथ अनधिकृत फेरीवाल्यांपासून मुक्त करण्याची मोहीम राबविताना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सीताराम जाधव मार्ग, गणपतराव कदम मार्गावरील परवानाधारक स्टॉलवर देखील बेकायदेशीरपणे केलेल्या कारवाईबाबत.

(३) **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १६ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

नागपूर मधील दिक्षाभूमीचा विकास करून सौंदर्यीकरण करण्याबाबत.

**सहा : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील साखर कारखान्यांमध्ये सर्रास काटामारी व रिकव्हरी चोरी करून ऊस उत्पादक शेतक-यांची फसवणूक होणे, चालू गळीत हंगामात तर सरासरी एकूण गाळप झालेल्या ऊसाच्या १० ते १५ टक्के वजनात घट आलेली असणे, काटामारी बरोबर रिकव्हरी चोरी करण्याचे प्रमाणही वाढल्याने ऊस उत्पादक शेतकरी, वाहतूकदार व ऊस तोडणी मजूर दुहेरी संकटात सापडणे, यामुळे राज्यातील सर्व साखर कारखान्याच्या बाहेर राज्य सरकारने संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, साखर सहसंचालक यांच्या नियंत्रणात वजनकाटा उभारण्याची मागणी असणे, स्वतंत्र वजनकाटे बसविले जाऊन ते डिजीटल व

ऑनलाईन प्रणालीने शासनाच्या मुख्य सर्व्हरला जोडणे, साखर नियंत्रण आदेश १९६६ नुसार दोन साखर कारखान्यामधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट रद्द करणे, FRP चे तुकडे करणारा शासन निर्णय रद्द करून एकरकमी एफआरपी देणारा निर्णय घेणे, साखर कारखाने उसाचा सिरप, मळीपासून इथेनॉल तयार करत असल्याने साखर उताऱ्यात घट होणे, त्याचा परिणाम ऊस दरावर होऊन त्याचा थेट फटका लाखो शेतकऱ्यांना बसणे, त्याचप्रमाणे साखर कारखान्यावर ऊस थकीत देयकांमुळे RCC कार्यवाही तात्काळ होणे, सन २०१६-१७ च्या ऊस गाळप हंगामामध्ये राज्यातील १९ साखर कारखान्यांचा FRP पेक्षा RSF ऊस दर अधिक निघणे, परंतु त्या साखर कारखान्यांनी RSF नुसार शेतकऱ्यांना ऊस देयके दिलेले नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(गुरूवार, दिनांक ५ मार्च, २०२६ व सोमवार, ९ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)** - [**अनुक्रमांक** (२)] —

(२) **श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"अकोला महानगरपालिकेमध्ये मालमत्ता सर्वेक्षणाच्या नावाखाली सुरु असलेल्या दादागिरीने महानगरपालिकेने बेकायदेशीररित्या कंत्राटे देण्यात आली असल्याचे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, महानगरपालिकेने दिलेली सदरची कंत्राटे व त्यांच्यामार्फत नेमलेल्या संबंधित कंत्राटदाराच्या कर्मचाऱ्यांनी, नागरिकांच्या घरात घुसून महिलांना धमकावणे, फोटो काढणे आणि मानसिक छळ करण्यात येत असल्याचे त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, त्याप्रकरणी तेथील सामाजिक कार्यकर्ते यांनी विभागीय आयुक्त, नगरविकास विभाग,मंत्रालय आणि पोलिस विभागाकडे दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास तक्रार केलेली असणे, सदर तक्रारीमध्ये कंत्राटदारामागील राजकीय सूत्रधार आणि त्याच बरोबर दोषी अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला असणे, परिणामी, सामाजिक कार्यकर्ते तसेच जनतेकडून देण्यात आलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"अमरावती शहरात मोठ्या प्रमाणावर एमडी ड्रग्ज (Mephedrone) या अंमली पदार्थाची तस्करी आणि विक्री होत असल्याची धक्कादायक बाब फेब्रुवारी २०२६ च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, महसूल गुप्तचर

संचालनालय (DRI) आणि नार्कोटिक्स विभागाने केलेल्या 'सर्जिकल स्ट्राईक' मध्ये अमरावतीतील नवसारी परिसरातून सुमारे ४ किलो ९०० ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात येणे, ज्याची आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत सुमारे ७.४५ कोटी ते १० कोटी रुपयांच्या घरात असणे, प्राथमिक तपासात सदर ड्रग्जचा साठा गुजरातच्या अहमदाबाद येथून आंतरराष्ट्रीय टोळीच्या (International Syndicate) माध्यमातून अमरावतीत आणला गेल्याचे निष्पन्न होणे, शहरात २०२१ पासून एमडी ड्रग्जची विक्री सुरू असताना आणि अमरावती ड्रग्ज विक्रीचे 'हब' बनत असताना स्थानिक पोलीस प्रशासनाला याची कुणकुणही न लागणे, यावरून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे, या रॅकेटमध्ये शहरातील काही हॉटेल मालक आणि कुख्यात गुटखा माफियांचा सहभाग असण्याची दाट शक्यता वर्तवली जाणे, ड्रग्ज विक्रीचे हे जाळे शैक्षणिक संस्था आणि तरुण पिढीपर्यंत पोहोचल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती मोठी असून मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचण्यासाठी सखोल चौकशीची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"मुंबई महानगरपालिकेकडून विविध प्रकल्प राबविण्याची सुरु असलेली मोहिम, या प्रकल्पामधील सेंट्रल पार्कला १०२ वास्तुविशारद यांचा असलेला प्रचंड विरोध, वरळी येथील हेलिपॅड, मुंबई आय प्रकल्प, मनोरंजन केंद्र व फूड कोर्ट या प्रकल्पासही स्थानिकाचा विरोध, पालिकेने ५००० कोटींपेक्षा अधिक निविदा काढूनही अद्याप रस्त्यांची कामे सुरु न होणे, यावर्षीच्या अर्थसंकल्पात ३००० हजार कोटींची असलेली मागणी, प्रत्यक्षात १ हजार कोटी तरतुद करणे, तसेच मुंबई शहराची जीवनरेखा असलेली बेस्ट डबघाईत जाण्याच्या वाटेवर असणे, मुंबई महानगरपालिकेने विविध प्रकल्पाकरिता भरीव तरतुद करताना बेस्ट उपक्रमाकडे केलेले दुर्लक्ष, परिणामी बेस्ट आर्थिक अडचणीत येणे, तसेच बेस्ट उपक्रमात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे वेतन व अनेक मागण्या प्रलंबित असणे, यासंदर्भात विविध आयुधांद्वारे सभागृहामध्ये शासनाचे लक्ष वेधले असता राज्यमंत्री, नगरविकास यांनी आश्वासन देऊन एक संयुक्त बैठक घेण्याचे दिलेले आश्वासन, सदर आश्वासनाची अद्याप पूर्तता न होणे, कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांबाबत आंदोलन करण्याचा दिलेला इशारा, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबई महानगरपालिकेकडून निधीचा होत असलेला अपव्यय, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून स्थानिक नागरिक व बेस्ट कर्मचारी यांच्याशी समन्वय साधून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"मुंबईतील खार (जवाहर नगर—गोळीबार) परिसरात सक्षम प्राधिकारी क्र. २, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, वांद्रे (पूर्व) यांच्या नोटीसीनुसार ३ के (क्लस्टर) अंतर्गत सर्वेक्षण सुरू करण्याची कार्यवाही होत असून सदर १२५ एकर क्षेत्रासाठी शिवालिक व्हेंचर्स प्रा. लि. यांची एकमेव विकासक म्हणून नियुक्ती करण्यात आली असणे, मात्र गेल्या २१ वर्षांत सुमारे ५,५०० झोपड्या पाडून केवळ २,२२८ घरे बांधण्यात आली असून हजारो कुटुंबे आजही पुनर्वसनाच्या प्रतिक्षेत असणे, अनेक भाडेकरूंना भाडे न मिळाल्याने त्यांच्यावर अन्याय झाला असणे, तसेच सुमारे ४५ एकर संरक्षण विभागाच्या जमिनीबाबत स्पष्ट परवानगी नसताना विकासाचा प्रयत्न होत असल्याची तक्रार असणे, सदर सर्वेक्षणाबाबत पारदर्शकता नसून माहिती अप्रत्यक्षपणे विकासकाकडे जाण्याची भीती व्यक्त होत असल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने सदर ३ के प्रकल्पाची चौकशी करून सुरू असलेले सर्वेक्षण तात्काळ स्थगित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री. सदाशिव खोत, संजय केणेकर, राजहंस सिंह**, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासी गावांचे राज्य सरकारने यापूर्वी दोन वेळा सर्वेक्षण केले असून त्याचे अहवाल राज्य सरकारला सादर झाले असणे, कांदिवली, गोरेगाव येथील आदिवासी पाड्यांवरील स्थानिकांनी दोन अडीच वर्षांपूर्वी वनहक्क दावे दाखल केले असून या दाव्याच्या आधारे आदिवासी लढा देत असणे, केंद्र सरकारच्या वनहक्क दाव्यांच्या माध्यमातून आदिवासींकडून जंगलामध्ये जगण्याचा व उत्पादनावरील हक्क प्रस्थापित करता येत असताना मुंबईत संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली असणे, बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रहिवाशांच्या घरांवर कारवाई सुरु असून ही कारवाई सन १९९७ च्या उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार होत असल्याचे सांगण्यात येत असणे, या सुरु असलेल्या तोडक कारवाईबाबत राज्याचे वन मंत्री यांनी दिनांक २७ जानेवारी, २०२६ वा त्यासुमारास बैठक घेतली असून तोडकामास स्थगिती देऊन राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांकडे व्यापक बैठक घेण्याचा निर्णय जाहीर केला असणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट होण्यासाठी आदिवासींवर वन विभागाकडून दबाव आणला जात असणे, यामुळे येथील आदिवासी व स्थानिकांमध्ये रोष निर्माण झाला असणे, न्यायालयीन निर्णयांमधून मार्ग काढून

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील आदिवासींना त्याच ठिकाणी कायमचा निवारा मिळण्याबाबत ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(७) **श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्यावर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध शिक्षक संघटनांनी थकित बिले प्रलंबित ठेवणे, शिक्षकांचे वेतन वेळेवर न काढणे, कोणत्याही कामासाठी पैशाची मागणी करणे, कार्यालयात नियमित उपस्थित न राहणे, शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता वेळेवर न देणे, अल्पसंख्यांक शाळांतील शिक्षकांच्या देखील वैयक्तिक मान्यता न देणे, अनुकंपा नियुक्ती करण्यास टाळाटाळ करणे, शिक्षकांना कोर्टाचे आदेश असून देखील त्यांना मान्यता न देणे, त्यामुळे कोर्टाच्या आदेशाचा भंग करणे, शालार्थ प्रणाली करिता प्रस्ताव वेळेवर सादर न करणे, वरिष्ठ व निवड श्रेणी मान्यता देण्यास टाळाटाळ करणे, वैद्यकीय बिलांच्या मान्यता थांबवून ठेवणे, अशा अनेक प्रश्नांवर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनांनी त्यांच्या विरोधात आक्रोश आंदोलन सुरू केलेले असणे, अशा अकार्यक्षम व वरीलप्रमाणे आरोप असलेल्या सिंधुदुर्ग जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्यावर शासनाने तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**सात : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**आठ : सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस)**

**नऊ : (सोमवार, ९ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा)–**

**सर्वश्री विक्रांत पाटील,** प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"पनवेल क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पुनर्विकास तसेच विविध विकास प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या झोपडपट्टी धारकांच्या निवाऱ्यासाठी MMRDA रेंटल हाऊसिंग योजनेतील घरे मिळण्याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून नगरविकास विभागाकडे दिनांक ७ नोव्हेंबर, २०२५ रोजी मागणी करण्यात आलेली असणे, बालाजी सिम्फोनी (सुकापूर), मॅरेथॉन (पळस्पे) या रेंटल प्रकल्पातील शासकीय कोट्यातील ७८९१ घरे तसेच रोहिंजन येथील अधिराज, सुप्रीम-५ व ब्यु सर्कल या रेंटल हाऊसिंग प्रकल्पातील शासकीय कोट्यातील ३२१- घरे अशी एकूण १११०९ घरांची संख्या असणे, MMRDA कडून सदरची घरे गिरणी कामगारांसाठी देणे प्रस्तावित

असल्याचे सांगण्यात येणे, परंतु गेल्या ८ वर्षात प्रत्यक्षात कोणतीही प्रक्रिया पूर्ण केलेली नसणे, स्थानिक स्वराज्य संस्थांना ५०% घरे देण्याच्या दिनांक २३ ऑगस्ट, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदरची ५०% घरे शासनाकडून पनवेल महानगरपालिकेला देणे, पनवेल महानगरपालिकेकडून प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत झोपडपट्टी-पुनर्वसनाच्या कामासाठी सिडकोकडे पूर्वाश्रमीच्या-ग्रामपंचायत कळंबोली हद्दीतील सर्व्हे क्र.५३ या भूखंडाची मागणी केलेली असणे, भूखंडाचा वापर हा झोपडपट्टी पुनर्वसनाकरिता करण्याचा पनवेल महानगरपालिकेचा चांगला हेतू असणे, या भूखंडावरती त्यावेळी PMAY प्रकल्प मंजूर झालेला असणे, सिडकोकडून या प्रकल्पासाठी सर्व्हे नं. ३३ ही जागा प्रस्तावित केलेली असणे, सदर भूखंडाकरिता रुपये ३१ कोटी २३ लक्ष ३३ हजार ८८२ एवढी रक्कम दिनांक २२ ऑगस्ट, २०२३ रोजी पनवेल महानगरपालिकेकडून भरणा करून घेतलेली असणे, सिडकोने सर्व्हे नं.५९ हा भूखंड पनवेल महानगरपालिकेला देण्याचे कबूल करणे, परंतु सन २०२३ पासून १४ वेळा पत्रव्यवहार करूनही भूखंडाची पूर्तता अजूनही केलेली नसणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**दहा : शासकीय विधेयके —**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र उद्‌वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**अकरा : (सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित "जागतिक महिला दिन" प्रस्ताव )— (मंत्र्यांचे उत्तर)**

**मा.सभापती यांचा प्रस्ताव ---**

"दिनांक ८ मार्च, २०२६ हा दिवस "आंतरराष्ट्रीय महिला दिन" म्हणून जागतिक स्तरावर साजरा करण्यात येणे, नारी शक्तीच्या प्रेरणास्थानी असलेल्या मा.आई जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या या पुण्यभूमीत महिला सक्षमीकरण व बळकटीकरणाच्या विविध कल्याणकारी योजना आखून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून महिला वर्गात आत्मविश्वास व आत्मनिर्भरता निर्माण करणे, ४ थ्या महिलाधोरणामध्ये विहित शाश्वत विकास व महिला सक्षमीकरण या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने प्रत्येक विभागासाठी कृती कार्यक्रम व त्यासाठी अपेक्षित विकास मोजमापाचे निर्देशांक निश्चित केलेले असणे, त्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून शासनाने आरोग्य, कायदा, बचतगट, सहकारी संस्था, महिला कामगार, महिला ऊसतोड कामगार, अत्याचार पीडीत महिला यांचेसाठी अनेक कार्यक्रम घेण्याची आवश्यकता, या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक तरतूद करणे, असंघटीत कामगार विशेषत: महिला कामगारांसाठी विशेष कार्यक्रमांची असलेली आवश्यकता,

शासनाने शेतकरी व शेतमजूर महिलांसाठी तसेच महिला शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना, महाराष्ट्रात महिलांच्या सर्वसमावेशक आर्थिक सबलीकरणासाठी महिला बचत गट व महिला सहकारी संस्थांचे बळकटीकरण करणे, शहरी उपजिविका अभियानांद्वारे महिलांमधील कौशल्य व उद्योजकता वृध्दिंगत करणे व त्यांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे, आदिवासी व पर्यावरणदृष्ट्या संवेदनशिल क्षेत्रांमध्ये महिला वन कामगार, वनोत्पादकांचे संकलन, वननिवासी महिला निसर्ग पर्यटन तसेच वन व पर्यावरण संवर्धनात महिलांचा प्रभावी सहभाग व शाश्वत विकासाठी कृती कार्यक्रम राबविणे, किशोरवयीन मुलींना आरोग्य, पोषण, सुरक्षितता व स्वच्छतेबाबतचे प्रशिक्षण देणे, महिलांमध्ये डिजिटल साक्षरता तसेच ई-गव्हर्नन्स प्रणालीबाबत जागरुकता निर्माण करणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधींचे क्षमतावर्धन करुन महिलांमधील नेतृत्वगुणांचा विकास करणे, लिंगसापेक्ष अर्थसंकल्पिय तरतूदींबाबत जागरुकता निर्माण करणे, स्त्री-पुरुष समानतेप्रती अर्थधोरण राबविणे, महिलांच्या सुरक्षिततेसंदर्भात प्रभावी कायदे तयार करुन त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, महिलांमध्ये डिजीटल व्यवहार व सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती करुन डिजीटल प्रणालीमध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याच्यादृष्टीने प्रशिक्षण देणे, कौटुंबिक हिंसाचार व अत्याचारग्रस्त महिलांचे सक्षमीकरण, समुपदेशन व पुनर्वसन करणे, महिलांसाठी दुग्धव्यवसाय पतसंस्था, हस्तकला, स्वयंसहायता गट, महिला बचत गट, महिलांसाठी अनुरुप शहरी कौशल्य केंद्रे, महिला उद्योजकांसाठी सार्वजनिक-खाजगी-भागिदारी उपलब्ध करुन देणे, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला, महिला कामगार यांचे सक्षमीकरण करणे, महिला विकासाच्या अनुषंगाने प्रत्येक विभागाने विभागनिहाय कृती कार्यक्रम जाहिर करुन त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची अपेक्षा विचारात घेता यासंदर्भात शासनाने करावयाची उपाययोजना."

**बारा** : **सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. संजय खोडके, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, चंद्रकांत रघुवंशी, डॉ. परिणय फुके, सर्वश्री इद्रिस नायकवडी, अमरिशभाई पटेल, पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री अमित गोरखे, विक्रांत पाटील, दादाराव केचे, संदीप जोशी, योगेश टिळेकर, संजय केणेकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजहंस सिंह, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग राठोड, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव** —

"दावोस मध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व तत्कालीन उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, उप मुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावरहाऊस' झाले असणे, १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करण्यात येणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत करण्यात आला असणे, "माझी वसुंधरा अभियान" राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकीय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमत्तेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याकरिता आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**तेरा : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

**(१) श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

**"राज्यातील राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे आगार बी.ओ.टी. तत्वावर देण्याबाबत"** या विषयावरील **श्री. राजहंस सिंह, वि.प.स. यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक १७४३ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**(२) सर्वश्री सत्यजीत तांबे, किशोर दराडे, विक्रम काळे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित** करतील.

"**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी योजना बंद केल्याबाबत**" या विषयावरील **डॉ. परिणय फुके व इतर वि.प.स.यांचा** तारांकित प्रश्न क्रमांक ५१३३ ला दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तरातून उद्भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : ९ मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

---